**<u>विशेष दिवाणी वाद क्र.०८/२०१३</u>**

## <u>निशाणी २४ वरील आदेश</u>

प्रतिवादी क्र. २ ते १५ यांनी या प्रकरणी कैफियत सादर करणेस झालेला विलंब माफ करून या प्रकरणी झालेला विनाकैफियत आदेश रद्द करून प्रतिवादी यांची कैफियत स्विकृत करणेस परवानगी मिळावी, याकरिता हा अर्ज दाखल केला आहे.

वादी यास या अर्जावर अभिप्राय देणेस मुभा देणत आली, वादी याने प्रतिवादी यांचा हा अर्ज मंजूर करणेस त्यांची हरकत नसलेचे स्पष्ट केले आहे.

प्रतिवादी क्र. २ ते १५ तर्फे सन्माननीय विधिज्ञांनी त्यांचे युक्तीवादात असे स्पष्ट केले की, प्रस्तुतचे वाद प्रकरण हे स्थावर मिळकती संदर्भातील प्रकरण आहे. वादी यांचा झालेल्या विलंबाबत कोणताही आक्षेप नाही. प्रतिवादी क्र. २ तें १५ यांना त्यांची बाजू मांडणेची संधी दिलेस वाद प्रकरण गुणदोषावर निर्णयीत होणेस मदत होणार आहे. वादीतर्फे सन्माननीय विधिज्ञांनी योग्य तो आदेश पारीत करणेबाबत युक्तीवाद सादर केला.

सन्माननीय विधिज्ञांच्या युक्तीवादाच्या पार्श्वभूमीवर मी उपलब्ध कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वाद प्रकरण हे स्थावर मिळकतीचे खर्चाबाबतचे प्रकरण आहे. कैफियत सादर करणेस झालेला विलंब माफ केला गेलेस वादी यांचे नुकसान होणेचे कारण नाही. वाद प्रकरणाचे गुण दोषावरील निर्गतीकरिता झालेला विलंब माफ करून कैफियत स्विकृत करणे न्यायोचित ठरेल म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २ ते १५ यांना कैफियत सादर करणेस झालेला विलंब माफ करणेत येत आहे, व त्यांनी दाखल केलेली कैफियत स्विकृत करणेत येत आहे.

३. उभय पक्षाने आदेशाची नोंद घ्यावी.

स्थळ : पंढरपूर<br>
दि.२५/१०/२०१३

(राजेंद्र व्यंकटेश हुद्दार)<br>
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,पंढरपूर